# प्रकरण चौथे

# माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

# प्रकरण चौथे

## *माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन*

४.१ प्रस्तावना

४.२ प्राचार्यांच्या प्रश्नावलीच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

- क) प्राचार्यांची वैयक्तिक माहिती.
- ख) कनिष्ठ महाविद्यालयांची सर्वसामान्य माहिती.
- ग) महाविद्यालयातील भौतिक सुविधाविषयक माहिती.
- घ) मुलींच्या शिक्षणाविषयी सामाजिक दृष्टकोनाची माहिती.
- च) मुलींच्या आर्थिक समस्याविषयी माहिती.
- छ) मुलींच्या समायोजनाविषयी माहिती.
- ज) मुलींच्या शिक्षणातील समस्याविषयीची माहिती.

४.३ प्राध्यापकांच्या प्रश्नावलीच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

- क) प्राध्यापकांची वैयक्तिक माहिती.
- ख) विद्यार्थीनींच्या वैयक्तिक शैक्षणिक व सामाजिक समस्यांविषयी माहिती.
- ग) सहशिक्षणाविषयी माहिती.
- घ) मुलींच्या शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी शासनाच्या प्रयत्नाविषयी माहिती.

४.४ विद्यार्थिनीच्या मुलाखतीव्दारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन.

४.५ भेटी व निरीक्षणाव्दारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

४.६ समारोप

# प्रकरण चौथे

## माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

### ४.१ प्रस्तावना

प्रकरण तीन मध्ये संशोधनासाठी माहिती मिळविण्यासाठी कोणती पध्दती व साधने वापरली हे दिले आहे. "उच्च माध्यमिक स्तरावील मुलींचे शिक्षण - एक चिकित्सक अभ्यास" त्या प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे.

उच्च माध्यमिक विद्यालयांच्या प्राचार्यांना प्रश्नावली दिली होती. तसेच उच्च माध्यमिक विद्यालयांच्या प्राचार्यांना प्रश्नावली देऊन माहिती जमा केली. उच्च माध्यमिक मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलीच्या मुलाखती घेतल्या. उच्च माध्यमिक विद्यालयाला प्रत्यक्ष भेटी देऊन निरीक्षण केले. प्रश्नावली, मुलाखती, भेटी व निरीक्षण यांचा उपयोग करुन मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन या प्रकरणात केले आहे.

### ४.२ प्राचार्यांच्या प्रश्नावलीच्या सहाय्याने मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

संशोधिकेने संशोधनाची उद्दिष्ट्ये लक्षात घेऊन प्रश्नावली तयार केली. प्रश्नावली परिशिष्ट 'अ' मध्ये दिली आहे. एकूण पंधरा प्राचार्यांनी प्रश्नावली भरुन दिली.

#### क) प्राचार्यांची वैयक्तिक माहिती

या विभागातील प्र. १ व २ हे प्राचार्यांचे नाव व त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या नावाविषयी होते. त्यावरुन आलेल्या प्राचार्यांच्या नावांची यादी, त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयांची यादी परिशिष्ट 'ब' मध्ये दिली आहे.

14136
A

प्रतिसादकाकडून माहिती मिळविताना प्रतिसादक जर जास्त शैक्षणिक व्यवसायिक पात्रता धारण करणारे असतील तर त्यांच्याकडून मिळणारी माहिती ही अधिक महत्त्वाची असते. तसेच बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य योग्य त्या शैक्षणिक पात्रतेचे होते का ते पहावे म्हणून या विभागातील प्र. क्र. ३ हा प्रतिसादकांच्या शैक्षणिक अर्हतेसंबंधी विचारला होता. त्या माहितीचे वर्गीकरण पुढे दिले आहे.

**कोष्टक क्र. ४.१**

**प्रतिसादक प्राचार्यांच्या शैक्षणिक अर्हतेचे वर्गीकरण**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | प्रतिसादक प्राचार्य संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | एम.कॉम. पी.एच.डी. | १ | ०६.६८ |
| २ | एम.ए. बी.एड. | २ | १३.३५ |
| ३ | एम.ए. | १ | ०६.६८ |
| ४ | बी.एस्सी. एम.एड. | २ | १३.३५ |
| ५ | बी.एस्सी. बी.एड. | ३ | १९.९१ |
| ६ | बी.ए. बी.एड. | ४ | २६.६८ |
| ७ | बी.कॉम. बी.एड. | १ | ०६.६८ |
| ८ | बी.ए. बी.पी.एड. | १ | ०६.६८ |
| | एकूण | १५ | १०० |

उच्च माध्यमिक विद्यालयांच्या १५ प्राचार्यपैकी ४ प्राचार्य (२६.६८ टक्के) बी.ए., बी.एड., ३ (१९.९१ टक्के) बी.एस्सी.,बी.एड. होते. बी.कॉम.,बी.एड. बी.कॉम., बी.पी.एड. प्रत्येकी १ असे एकूण १५ पैकी ९ प्राचार्य (६०.१२ टक्के)

प्रशिक्षित पदवीधर होते. एम.कॉम., पी.एच.डी. १, एम.ए., बी.एड. २, एम.ए. १ तर बी.एस्सी., एम.एड. २ असे ६ (३९.८८ टक्के) कोणत्यातरी एका प्रशिक्षणाच्या बाबतीत पदव्युत्तर होते. वास्तविक कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची पात्रता एम.ए. किंवा एम.कॉम किंवा एम.एस्सी., बी.एड. असणे आवश्यक आहे. परंतु १५ पैकी १२ कनिष्ठ महाविद्यालये माध्यमिक शाळेशी सलग्न असल्याने शैक्षणिक अर्हता माध्यमिकशी पूरक अशी होती. परंतु कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य एम.ए., एम.कॉम. किंवा एम.एस्सी., एम.एड. असावेत.

सहा (४० टक्के) प्राचार्य आवश्यक ती शैक्षणिक पात्रता धारण करणारे होते. बाकीचे ९ (६० टक्के) प्राचार्य आवश्यक ती शैक्षणिक पात्रता धारण न करणारे होते.

यावरुन बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील बहुसंख्य प्राचार्य हे आवश्यक ती शैक्षणिक पात्रता धारण न करणारे होते. त्याचा परिणाम प्रशासनावर होतो. कारण त्यांच्या अधिकाराखाली काम करणारे प्राध्यापक त्यांच्यापेक्षा जास्त शैक्षणिक पात्रता धारण करणारे असतात व असे प्राचार्य त्यांच्यावर पुरेसा वचक ठेवू शकत नाहीत असे संशोधिकेला वाटते. योग्य प्रशासन व नियोजनाच्या दृष्टीने हे निश्चितच योग्य नाही. सर्व प्राचार्य एम.ए., एम.एड. म्हणजे ते शैक्षणिक पात्रतेनुसार आपल्या सहकारी प्राध्यापकांच्या व्यवसायिक गुणवत्तेवर देखरेख करु शकतात. त्यांना मार्गदर्शन करु शकतात.

या विभागतील प्र.क्र. ४ हा प्राचार्यांच्या अध्यापन अनुभवाविषयी होता. प्रश्नावलीव्दारे प्राप्त माहिती पुढील कोष्टकात दिली आहे.

## कोष्टक नं. ४.२
### प्राचार्यांच्या अनुभवाचे वर्गीकरण

| अ.क्र. | अनुभव वर्षे | प्राचार्य संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ०५ ते १० | २ | १३.३३ |
| २ | ११ ते १३ | ३ | २०.०० |
| ३ | १६ ते २० | २ | १३.३३ |
| ४ | २१ ते २५ | २ | १३.३३ |
| ५ | २६ ते ३० | ३ | २०.०१ |
| ६ | ३१ ते ३५ | ३ | २०.०१ |
| | एकूण | १५ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, ५ ते १० वर्षे अनुभव असणारे प्राचार्य २ (१३.३३ टक्के) होते. ११ ते १५ वर्षे अनुभव असणारे प्राचार्य ३ (२० टक्के), १६ ते २० वर्षे अनुभव असणारे प्राचार्य २ (१३.३३ टक्के), २१ ते २५ वर्षे अनुभव असणारे प्राचार्य २ (१३.३३ टक्के), २६ ते ३० वर्षे अनुभव असणारे प्राचार्य ३ (२० टक्के), ३१ ते ३५ वर्षे अनुभव असणारे प्राचार्य ३ (२० टक्के).

कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य पुरेशा अनुभवाचे होते असे दिसून आले.

## ख) कनिष्ठ महाविद्यालयांची सर्व सामान्य माहिती

या विभागामध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील सर्वसामान्य माहितीवर प्रश्न होते यामध्ये ५ ते १७ असे एकूण १३ प्रश्न विचारले होते.

या विभागातील प्र.क्र. ५ हा कनिष्ठ महाविद्यालय माध्यमिक विद्यालयास जोडले आहे की वरिष्ठ महाविद्यालयास असा होता. प्रतिसादकाकडून मिळालेली

माहिती पुढील प्रमाणे होती. १५ महाविद्यालयापैकी १२ (८० टक्के) महाविद्यालये माध्यमिक विद्यालयांशी तर ३ (२० टक्के) वरिष्ठ महाविद्यालयांशी सलग्न होती. त्यांना माध्यमिक शाळेचे नियम जास्त प्रमाणात वापरले जात होते.

प्र.क्र. ६ हा कनिष्ठ महाविद्यालय वरिष्ठ महाविद्यालयास जोडले असल्यास त्याचे फायदे व तोटे कोणते असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिले आहे.

**कोष्टक क्र. ४.३**

**कनिष्ठ महाविद्यालय वरिष्ठला जोडले असता मिळणाऱ्या फायदयाचे वर्गीकरण**

| अ.क्र. | फायदे | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ग्रंथालय समृध्द असते, इमारत मोठी, अर्थिक समस्या. | १३ | ८६.६६ |
| २ | प्रयोग शाळा समृध्द असते | ११ | ७३.३३ |
| ३ | वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राध्यापकांचे सहकार्य व मार्गदर्शन मिळते | १३ | ८६.६६ |
| | एकूण | ३७ | |

**टीप** :- काही प्रतिसादकांनी एकापेक्षा जास्त पर्याय सांगितले असल्याने एकूण प्रतिसादक संख्या कोष्टक क्र. ४.३ मध्ये जास्त येते.

कोष्टक क्र. ४.३ वरुन असे दिसून येते की वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालय समृध्द असते. इमारत मोठी असते व आर्थिक समस्या कमी असतात असे म्हणणाऱ्यांची संख्या १३ (८६.६६ टक्के) होती, प्रयोगशाळा सुसज्ज असते असे म्हणणाऱ्यांची संख्या ११ (७३.३३ टक्के) होती, वरिष्ठ महाविद्यालयाच्या

प्राध्यापकांचे सहकार्य व मार्गदर्शन मिळते म्हणणाऱ्यांची संख्या १३ (८६.६६ टक्के) होती.

यावरुन आकडेवारीचे निरीक्षण करता ग्रंथालय समृध्द असते, इमारत मोठी असते व आर्थिक समस्या कमी असतात. वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राध्यापकांचे सहकार्य व मार्गदर्शन मिळते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांची संख्या प्रत्येकी ११ म्हणजे ८६.६६ टक्के होती यावरुन वरिष्ठ महाविद्यालयाला जोडल्याचे फायदेच जास्त होतात असे दिसून आले.

कनिष्ठ महाविद्यालये वरिष्ठ महाविद्यालयांना जोडण्यात कोणताच तोटा नसल्याचे प्राचार्यांच्या प्रतिसादावरुन लक्षात आले.

प्र.क्र. ७ कनिष्ठ महाविद्यालय माध्यमिक शाळांना जोडलेले असल्यास फायदे तोटे कोणते असा होता, प्रतिसादकांडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिले आहे.

## कोष्टक क्र. ४.४

### कनिष्ठ महाविद्यालय माध्यमिक शाळेला जोडल्या फायदे-तोटे दर्शविणाऱ्या प्रतिसादाचे वर्गीकरण

| अ.क्र. | फायदे | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | विद्यार्थी संख्या कमी असल्याने शिस्त राखण्यास मदत होते व वैयक्तिक लक्ष देता येते. | ९ | ६०.०० |
| २ | कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकांचा माध्यमिक शाळेसाठी अध्यापनात फादा घेता येतो. | १० | ६०.६६ |
| ३ | इतर | -- | -- |
| | एकूण | १९ | |

| अ.क्र. | तोटे | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ महाविद्यालयाचा कार्यभार कमी पडल्यास शिक्षकांना माध्यमिक शाळेचे तास घ्यावे लागतात. | ११ | ७३.३३ |
| २ | माध्यमिक शाळेचे अंदाज पत्रक कमी पैशाचे असल्याने कनिष्ठ महाविद्यालयास पुरेसे ग्रंथालय इमारत क्रिंडागण प्रयोगशाळा यांची उपलब्धता होत नाही. | ०९ | ६०.०० |
| ३ | माध्यमिक शाळांच्या सत्राप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाचे सत्र ठेवावे लागते त्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयाप्रमाणे सुट्टीचे फायदे मिळते नाहीत. | ०७ | ४६.६६ |
| ४ | तासिका कमी कालावधीची असल्याने अभ्यास क्रम सुसंगतपणे पूर्ण करता येत नाही. | ०४ | २६.६६ |
| ५ | इतर | --- | --- |

टीप :- प्रत्येक प्रतिसादक प्राचार्यांनी एकापेक्षा अधिक पर्याय सांगितल्याने शेकडा प्रमाण जास्त येते.

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की फायदे व तोटे दर्शविताना फायदयाबाबतचे अभिप्रायावरुन वैयक्तिक लक्ष देणे व विद्यार्थी संख्या कमी असल्याने शिस्त राखण्यास मदत होते असे ९ (६० टक्के) प्राचार्यांनी सांगितले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकांचा माध्यमिक शाळेसाठी अध्यापनात फायदा घेता येतो असे १० (६६.६६ टक्के) प्राचार्यांनी सांगितले.

तसेच माध्यमिक शाळेशी संलग्नतेबाबत तोटे या प्रतिसादामध्ये ११ (७३.३३ टक्के) प्राचार्यांनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राध्यापकांना माध्यमिकचे तास घ्यावे लागतात असे सांगितले व ९ (६० टक्के) प्राचार्यांनी पैशाअभावी ग्रंथालय, इमारत, क्रिंडागण, प्रयोग शाळा यांची उपलब्धता पुरेशा प्रमाणात होत नाही असे सांगितले. ७ (४४.६६ टक्के) प्राचार्यांनी वरिष्ठ महाविद्यालयाप्रमाणे सुट्टीचे फायदे

घेता येत नाहीत असे सांगितले. ४ (२६.६६ टक्के) प्राचार्यांनी कमी कालावधीच्या तासिका असल्याने अभ्याक्रम सुसंगतपणे पूर्ण करता येत नाही असे सांगितले.

यावरुन कनिष्ठ महाविद्यालय माध्यमिक शाळेशी जोडले असता शिस्त राखत्य येणे, वैयक्तिक मार्गदर्शन करणे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राध्यापकांचा अध्यापनात फायदा होणे इ. फायदे दिसून येतात.

कनिष्ठ महाविद्यालये माध्यमिक शाळेशी जोडल्यामुळे बरेच तोटे निदर्शनास येतात. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालये स्वतंत्र तरी असावीत किंवा वरिष्ठ महाविद्यालयास जोडलेली असावीत असे संशोधिकेस वाटते.

प्र.क्र. ८ हा कनिष्ठ महाविद्यालयातील शाखांविषयी विचारला होता. प्रतिसादकांकडून आलेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिले आहे.

**कोष्टक क्र. ४.५**

**कनिष्ठ महाविद्यालयातील शाखनुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | केवळ कला | ९ | ६०.०० |
| २ | कला व वाणिज्य | १ | ०६.६६ |
| ३ | कला व विज्ञान | ५ | ३३.३३ |
| ४ | कला, वाणिज्य व विज्ञान | ० | ००.०० |
| | एकूण | १५ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की केवळ कला शाखा असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या ९ (६० टक्के) होती. कला व वाणिज्य शाखा

असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या १ (६ टक्के), कला व विज्ञान शाखा असणाऱ्या महाविद्यालयांची संख्या ५ (३३.३३ टक्के) होती. कला, वाणिज्य व विज्ञान एकत्र असलेले एकही कनिष्ठ महाविद्यालय बार्शी तालुक्यात नव्हते यावरुन बहुतांश कनिष्ठ महाविद्यालयात केवळ कला शाखा असल्याचे दिसून आले. वाणिज्य शाखेकडे विद्यार्थ्यांचा कला कमी होता. विज्ञान शाखा असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाची संख्या ५ (३३.३३ टक्के) त्यामानाने कमीच होती त्यातील ३ तर वरीष्ठ महाविद्यालयाला जोडलेले होते. विद्यार्थ्यांचा कला शाखेकडे अधिक कल असल्याचे दिसून आले.

प्र.क्र. ९ हा कनिष्ठ महाविद्यालयातील माध्यमिक शाळेला जोडलेले असल्यास प्राध्यापकांना माध्यमिक शाळेचे काही तास घ्यावे लागतात का? असा होता.

प्रतिसादक प्राचार्यांकडून मिळालेल्या माहितीवरुन एकूण १५ महाविद्यालयापैकी १२ (८० टक्के) महाविद्यालये माध्यमिकला जोडलेली होती. त्या सर्वच प्राचार्यांनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राध्यापकांना माध्यमिकच्या तासिका घ्याव्या लागतात असे सांगितले. मिळालेल्या माहिती वरुन असे निदर्शनास आले की, कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना माध्यमिकेचे काही तास घ्यावे लागत असल्याने त्यांचे बौध्दिक श्रम वाढतात व त्यांच्या कामकाजावर त्याचा परिणाम होतो. माध्यमिक शाळेला जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील अध्यापनाचा दर्जा वरिष्ठ महाविद्यालयाला जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील अध्यापनाच्या दर्जापेक्षा कमी प्रतीचा असण्याचे हे एक कारण होऊ शकते असे संशोधिकेस वाटते.

माध्यमिक शाळांना जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील तासिकांचा कालावधी कमी असल्याने त्यांचा दैनंदिन अध्यापनावर काय परिणाम होतो हे जाणण्यासाठी प्र. १० विचारला होता.

प्राचार्यांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ४.६

### कमी कालावधीच्या तासिकांचा अध्यापनावरील परिणाम

| अ.क्र. | अध्यापनावर होणारा परिणाम | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | अभ्यासक्रम पूर्ण करणे अवघड जाते. | १५ | १००.०० |
| २ | अभ्यासक्रमाची साखळी सुसंगत ठेवणे अवघड जाते | ०२ | ०१३.३३ |
| ३ | इतर | --- | --- |
| | एकूण | १७ | |

टीप :- १५ पैकी काही प्राचार्यांनी दोन्ही पर्याय दिल्याने त्यांची संख्या १५ पेक्षा जास्त येते.

प्रतिसादक प्राचार्यांच्या प्रतिसादकावरुन १५ (१०० टक्के) प्राचार्य अभ्यासक्रम पूर्ण करणे अवघड जाते अशा मताचे होते तर २ (१३.३३ टक्के) प्राचार्य अभ्यासक्रमाची साखळी सुसंगत ठेवणे अवघड जाते या मताचे होते. यावरुन माध्यमिक शाळेशी जोडलेले कनिष्ठ महाविद्यालय फायदे देण्यापेक्षा त्याचे तोटेच जास्त असल्याचे दिसून आले. म्हणून कनिष्ठ महाविद्यालये वरिष्ठ महाविद्यालयासच जोडलेले असावे असे संशोधिकेस वाटते.

मुलींची प्रत्येक तुकडीतील संख्या जाणून घेण्यासाठी प्र. १२ विचारला होता.

प्रतिसादक प्रचार्यांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात देण्यात आले आहे.

## कोष्टक क्रं. ४.७

### विद्यार्थिनींची संख्या नुसार वर्गीकरण

इ. ११ वी

| अ.क्र. | विद्यार्थिनींची संख्या वारंवारिता | विद्यार्थिनींची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १५ - १९ | ४ | २६.६७ |
| २ | २० - २४ | २ | १३.३३ |
| ३ | २५ - २९ | ५ | ३३.३३ |
| ४ | ३० - ३४ | २ | १३.३३ |
| ५ | ३५ - ३९ | १ | ०६.६७ |
| ६ | ४० - ४४ | १ | ०६.६७ |
| | एकूण | १५ | १०० |

इ. १२ वी

| अ.क्र. | विद्यार्थिनींची संख्या वारंवारिता | विद्यार्थिनींची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १५ - १९ | १ | ०६.६७ |
| २ | २० - २४ | ८ | ५३.३३ |
| ३ | २५ - २९ | २ | १३.३३ |
| ४ | ३० - ३४ | २ | १३.३३ |
| ५ | ४० - ४४ | २ | १३.३३ |
| | एकूण | १५ | |

कोष्टक क्र. ४.७ वरुन असे दिसून आले की, इयत्ता ११ वी च्या वर्गात मुलींची संख्या १५ ते १९ असलेली चार कनिष्ठ महाविद्यालये होती. तर २५ ते १९ मुली असलेली ५ कनिष्ठ महाविद्यालये होती. एकूण ११ (७३.३४ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयातील मुलीची संख्या १५ ते २९ पर्यंत होती. तर ३० ते ४० विद्यार्थिनींची संख्या असणारी कनिष्ठ महाविद्यालये ४ (२६.३३ टक्के) होती. ८ (५३.३३) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता १२ वी च्या वर्गातील मुलींची संख्या २० ते २४ होती. बाकीच्या सात कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या सरासरी ३० होती. यावरुन बहुसंख्या कनिष्ठ महाविद्यालयातील ११ वी व १२ वी च्या वर्गातील मुलींची संख्या २० ते ३० दरम्यान असल्याचे दिसून येते हे प्रमाण एकूण मुलांच्या संख्येच्या खूपच कमी होते.

मुलींची संख्या कमी आहे की जास्त या बद्दल प्राचार्यांचे मत जाणण्यासाठी प्रश्न १३ विचारला होता.

मिळालेल्या माहितीवरुन केलेले वर्गीकरण कोष्टक नं. ४.८ मध्ये दिले आहे.

## कोष्टक क्र. ४.८

## मुलिंच्या प्रवेश संख्येच विश्लेषण

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मुलींची संख्या पुरेशी आहे. | ३ | २० |
| २ | मुलींची संख्या असमानाधनकारक आहे. | ५ | ३३.३३ |
| ३ | मध्यम आहे. | २ | १३.३३ |
| ४ | कमी आहे. | ५ | ३३.३३ |
| | एकूण | १५ | ९९.९९ |

## कोष्टक क्र. ४.९

### पालकांच्या मुलींच्या शिक्षणाविषयीचा दृष्टीकोण सांगणाऱ्या माहितीचे विश्लेषण

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पालकांचा नकारात्मक दृष्टीकोण | ९ | ६०.०० |
| २ | परगावी मुलींना शिक्षणासाठी पाठविणे असुरक्षित वाटते | २ | १३.३३ |
| ३ | अल्पवयीन मुलींचे विवाह करण्याची प्रवृत्ती | २ | १३.३३ |
| ४ | शिकलेल्या मुलींचे विवाह जमविणे अवघड वाटते | २ | १३.३३ |
| | एकूण | १५ | ९९.९९ |

पालकांचा नकारात्मक दृष्टीकोण असतो असे म्हणणाऱ्या प्रतिसादक प्राचार्यांची संख्या सर्वाधिक म्हणजे ९ (६० टक्के) होती तर शिक्षणासाठी मुलींना परगावी पाठविणे असुरक्षित वाटते म्हणणाऱ्या प्राचार्यांची संख्या २ (१३.३३ टक्के) होती. अल्पवयीन मुलींचे विवाह करण्याची पालकांची प्रवृत्ती म्हणणारे प्राचार्य २ (१३.३३ टक्के), शिकलेल्या मुलींचे विवाह जमविणे अवघड वाटते असे म्हणणारे प्राचार्य २ (१३.३३ टक्के) होते. यावरुन बहुतेक प्राचार्यांनी आपल्या प्रतिसादामध्ये पालकांचा नकारात्मक दृष्टीकोण या पर्यायाला समंती दर्शविली होती.

यावरुन बहुसंख्य पालकांचे ध्येय आपल्या मुलींचे १० वी पर्यंत शिक्षण करावयाचे व लग्नाचा विचार करायचा. आपल्या गावी कनिष्ठ महाविद्यालय नसल्याने व परगावी मुलिंना ठेवण्याची असुरक्षितता वाटत असल्याने बरेच पालक १० वी नंतर मुलींचे शिक्षण बंद करतात. मुलींचे लग्न होवून गेले की आपली

काळजी मिटली असे काही पालकांना वाटते त्यामुळे १० नंतर मुलींच्या शिक्षणात गळती सुरु होते. एकूण समाजाचा मुलीच्या शिक्षणाबाबतचा दृष्टीकोण नकारात्मक दिसून येतो असे दिसून आले.

मुलिंची उपस्थिती समाधानकारक आहे की नाही हे जाणण्यासाठी प्र.क्र. १५ विचारला होता.

या प्रश्नाला मिळालेल्या प्रतिसादावरुन १५ कनिष्ठ प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयापैकी १४ (९३.३३ टक्के) महाविद्यालयांचे प्राचार्य मुलींची उपस्थिती समाधानकारक आहे असे म्हणणारे होते. तर १ (६.६६ टक्के) प्रतिसादक प्राचार्य प्रवेश घेतलेली उपस्थिती असमाधानकारक आहे असे म्हणणारे होते. यावरुन प्रवेश घेतलेल्या मुलींची उपस्थिती समाधानकारक होती असे दिसून आले.

मुलींची उपस्थिती समाधानकारक नसल्याची कारणे शोधण्यासाठी प्र.क्र. १६ विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून मिळालेल्या माहितीनूसार एकाच प्राचार्याच्या मते मुलींची उपस्थिती समाधानकारक नव्हती कारण पालकांची मुलींच्या शिक्षणाबद्दलची अनास्था असावी असे मत प्रकट केले.

बार्शीच्या १३ प्राचार्याच्या मते मुलांच्या प्रवेश संख्येच्या मानाने मुलींच्या प्रवेशांची संख्या कमी होते ही बाब समाधानकारक नव्हती.

ह्यावरुन बहुसंख्य कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींच्यासाठी स्वतंत्र खोली (लेडिज रुम) आहे ही बाब अत्यंत असमाधानकारक वाटते.

मुलींची प्रवेश संख्या असमाधानकारक असण्याची कारणे जाणून घेण्यासाठी प्र.क्र. १७ विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यापैकी फक्त २ (१३.३३ टक्के) प्राचार्याच्या मते मुलींची प्रवेश संख्या समाधानकारक होती पण बाकीच्या १३ प्राचार्याच्या मते मुलांच्या प्रवेश संख्येपेक्षा मुलींच्या प्रवेशाची संख्या कमी होती ही बाब समाधानकारक नव्हती. ज्या दोन प्राचार्याच्या मते प्रवेश संख्या समाधानकारक होती त्यांच्या मते यांचे कारण शहरी भागातील मुलींचे पालक

मुलींच्या शिक्षणाविषयी जागृत असून पालक व मुली दोघांचाही दृष्टीकोन सकारात्मक होता असाच दृष्टकीकोण ग्रामीण भागातील पालकांमध्ये विकसीत व्हावा व मुलींच्या शिक्षणास चालना मिळावी असे संशोधिकेस वाटते.

महाविद्यालयातील भौतिक सुविधाविषयी माहिती मुलींच्या वर्ग तुकड्या वेगळ्या आहेत का हे जाणण्यासाठी प्र.क्र. १८ विचारला होता.

प्रतिसादक प्राचार्यांनी दिलेल्या माहिती नुसार सर्वच प्राचार्यांनी तुकड्या वेगळया नाहीत असे उत्तर दिले. यावरुन मुलींच्या तुकडया व मुलांच्या तुकडया वेगळया नव्हत्या व विद्यार्थीनीना समायोजनास काही समस्या येत नव्हत्या. सह शिक्षण मिळत होते ही बाब उल्लेखनिय आहे असे संशोधिकेस वाटते.

मुलींच्या मानसिक स्थिती चांगली राहण्यासाठी त्यांना सर्व सोयी सुविधा आवश्यक असतात. त्यांच्यासाठी स्वतंत्र खोली आहे किंवा नाही हे जाणण्यासाठी प्र.क्र. १९ विचारला होता.

प्रतिसादापैकी ६ प्राचार्यांनी ४० टक्के सोय नाही तर ९ (६० टक्के) प्राचार्यांनी रिकाम्या वेळेत वर्गात बसण्याची सोय करतो असे सांगितले. यावरुन बहुसंख्य कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींच्यासाठी स्वतंत्र खोली (लेडिज रुम) नव्हती ही बाब अत्यंत असमाधानकारक वाटली.

मुलींची संख्या समाधानकारक असल्याची कारणे जाणून घेण्यासाठी प्र.क्र. १७ विचारला होता.

प्रतिसादक प्राचार्यापैकी फक्त २ (१३.३३ टक्के) प्राचार्यांच्यामते मुलींची प्रवेश संख्या समाधानकारक नव्हती कारण शहरी भागातील मुलींचे पालक मुलांच्या शिक्षणाविषयी जागरुक असून पालक व विद्यार्थीनी दोघांचाही शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टीकोण होता. असा दृष्टीकोण ग्रामीण भागातील पालकांच्या मध्ये विकसित व्हावा व मुलींच्या शिक्षणास चालना मिळावी असे संशाधिकेस वाटते.

## ग) महाविद्यालयातील भौतिक सुविधाविषयक माहिती

मुलींच्या वर्ग तुकडया वेगळया आहेत का?. हे जाणण्यासाठी प्र.क्र. १८ विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यानी दिलेल्या माहिती नूसार सर्वच प्राचार्यानी तुकडया वेगळया नाहीत असे उत्तर दिले. यावरुन मुलींच्या तुकडया व मुलांच्या तुकडया वेगळया नव्हत्या व विद्यार्थिनींना समयोजनास काही समस्या येत नव्हत्या सहशिक्षण मिळत होते ही बाब उल्लेखनिय आहे असे संशोधिकेस वाटते.

मुलींची मानसिक स्थिती चांगली रहावी त्यांच्या काही वैयक्तीक समस्या असू शकतात त्यासाठी त्यांच्यासाठी स्वतंत्र खोली असावी अशी सोय प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयात आहे का? हे जाणण्यासाठी प्र.क्र. १९ विचारला होता.

१५ प्राचार्यांपैकी ६ (४० टक्के) प्राचार्यांनी त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये स्वतंत्र खोलीची सोय नाही तर ९ (६० टक्के) महाविद्यालयातील मुली तासिका नसलेल्या वेळेत वर्गातच बसतात असे सांगितले. त्यामुळे मुलींना स्वातंत्र राहत नाही. काही समस्या असल्यास ती दूर करता येत नाही. सर्वच महाविद्यालयामध्ये मुलींसाठी स्वतंत्र खोली असावी असे संशोधिकेस वाटते.

प्र.क्र. २१ मुलींसाठी स्वच्छतागृहाची स्वतंत्र व्यवस्था आहे का? असा होता.

प्रतिसादक प्राचार्यानी दिलेल्या माहितीनुसार १५ महाविद्यालयापैकी १३ (८६.६६ टक्के) महाविद्यालयामध्ये स्वच्छता गृहाची सोय होती. २ (१३.३३ टक्के) महाविद्यालयामध्ये स्वच्छतागृहाची व्यवस्था नव्हती प्रत्यक्ष पाहणीत संशोधिकेला असे आढळून आले की ४ (२० टक्के) महाविद्यालयांमध्ये स्वच्छतागृहाची सोय नव्हती. यावरुन अनेक कनिष्ठ महाविद्यालयात स्वच्छतागृहाची मुलीसाठी स्वतंत्र सोय नव्हती ही बाब मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने समाधानकारक नव्हती.

प्र.क्र. २२ स्वच्छतागृह नसल्यास पर्यायी व्यवस्था केली असेल तर ती जाणून घेण्यासाठी प्र.क्र. २२ विचारला होता.

प्रतिसादक प्राचार्यांनी दिलेल्या माहितीनुसार ज्या महाविद्यालयात स्वच्छतागृहाची व्यवस्था नव्हती तिथे पर्यायी व्यवस्था केलेली होती असे सांगितले असले तरी प्रत्यक्ष पहाणीत दुसरी सोय नव्हती व मुलींची कुचंबणा होत होती असे दिसून आले. ही बाब मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने योग्य नव्हती असे संशोधिकेस वाटते.

प्र.क्र. २३ मुलींच्या अभ्यासासाठी प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयात अभ्यासिकेची सोय असल्यास त्यांना महाविद्यालयामध्ये अभ्यास करता येतो. तशी सोय आहे का? हे पाहण्यासाठी प्र.क्र. २३ अभ्यासिकंच्या सोयीबद्दल विचारला होता.

प्रतिसादक प्राचार्यांनी दिलेल्या माहितीनुसार ११ (७३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अभ्यासिकेची सोय होती. तर ४ (२६.६६ टक्के) महाविद्यालयात अभ्यासिकेची सोय नव्हती. प्रत्येक्ष पहाणीमध्ये फक्त ४ महाविद्यालयांनाच अभ्यासिकेची सोय होती. यावरुन बहुसंख्या प्राचार्यांना त्यांच्या महाविद्यालयात कमतरता दिसून आली.

प्र.क्र. २४ अभ्यासिकेची सोय नसल्यास ही सोय कशी करता येईल असा होता. मिळालेल्या प्रतिसादावरुन ज्यात ४ (२६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात अभ्यासिकेची सोय नव्हती. त्या महाविद्यालयामध्ये प्रयोगशाळा व वर्ग खोल्यांचा अभ्यासिकेसाठी वापर केला जात होता ही बाब समाधानकारक वाटते.

प्र.क्र. २५ हा पिण्याच्या पाण्याची सोय कशी केली आहे असा होता. प्रतिसादाकडून मिळालेली माहिती पुढील कोष्टकात दिली आहे.

## कोष्टक क्र. ४.१०

## पिण्याच्या पाण्याविषयी माहिती वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पिण्याच्या पाण्याचा स्वतंत्र हौद आहे. | ५ | ३३.३३ |
| २ | स्वतंत्र टाकी आहे | ८ | ५३.३३ |
| ३ | मुला मुलींसाठी वेगवेगळया पाण्याच्या टाक्या आहेत. | १ | ०६.६७ |
| ४ | विद्यार्थी व प्राध्यापक यांची स्वतंत्र सोय आहे. | १ | ०६.६७ |
| | एकूण | १५ | १०० |

दिलेल्या कोष्टकावरुन असे दिसून येते की ५ (३३.३३ टक्के) प्रतिसादकांनी पिण्याच्या पाण्याचा हौद आहे असे सांगितले. ८ (५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी स्वतंत्र टाकी आहे असे सांगितले तर १(६.६७ टक्के) प्रतिसादकांनी मुलामुलीसाठी वेगवेगळया टाक्यांची सोय आहे व १ (६.६७ टक्के) प्रतिसादकांनी विद्यार्थी व प्राध्यापकांची स्वतंत्र सोय केली असल्याचे सांगितले व प्रत्यक्ष पाहणीत हेच दिसून आले. यावरुन विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय समाधानकारक होती असे दिसून आले.

प्र.क्र. २६ मुलीसाठी सायकल स्टँड आहे का असा होता. प्रतिसादक प्राचार्यांनी दिलेल्या प्रतिसादावरुन १५ कनिष्ठ महाविद्यालयापैकी सर्वच १५ (१०० टक्के) महाविद्यालयामध्ये सायकल स्टँड सोय होती व प्रत्यक्ष पाहाणीतही सर्वच महाविद्यालयात सायकल स्टँडची सोय होती ही बाब उल्लेखनीय वाटली.

## घ) मुलींच्या शिक्षणाविषयी सामाजिक दृष्टीकोणासंबंधी माहिती

मुलींच्या शिक्षणाविषयी आजही समाजात इतकी जागृतता दिसत नाही. त्यामुळे सध्या कनिष्ठ महाविद्यालयात मुलींना पाठविण्याविषयी व त्यांच्या शिक्षणाविषयी समाजाचा कोणता दृष्टीकोन आहे हे जाणण्यासाठी प्र.क्र. २७ मुलींचे पालक त्यांच्या शिक्षणाविषयी अस्थावाईकपणे चौकशी करतात का? असा विचारला होता.

मिळालेल्या माहिती नुसार १५ महाविद्यालयाच्या प्राचार्यपैकी १४ (९३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्यांनी मुलींचे पालक अस्थेवाईकपणे चौकशी करतात असे सांगितले. तर १ (६.६६ टक्के) प्राचार्य पालक चौकशी करीत नाहीत असे म्हणतात. यावरुन बरेचसे पालक मुलींच्या शिक्षणाविषयी जागृत होत असे दिसून येते.

प्र.क्र. २८ मुलींच्या पालकांचा दृष्टकीकोण मुलींच्या शिक्षणाविषयी सकारात्मक आहे का? असा होता

प्रतिसादक प्राचार्याकडून मिळालेल्या माहितीनूसार १२ (९३.३३ टक्के) प्रतिसादक प्राचार्य पालकांचा दृष्टीकोण सकारात्मक आहे असे म्हणत होते. तर १ (६.६६ टक्के) प्रतिसादक प्राचार्य पालकांचा दृष्टीकोण नकारात्मक आहे असे म्हणत होते. यावरुन बहुतांश पालकांचा सकारात्मक असे दिसून आले तर सर्वच पालकांचा दृष्टीकोन नकारात्मक असे म्हणत होते. यावरुन बहुतांश पालकांचा दृष्टीकोन सकारात्मक आहे असे दिसून आले. परंतू सर्वच पालकांचा दृष्टीकोन म्हणजे १०० टक्के पालकांचा दृष्टकीकोन मुलींच्या शिक्षणाबाबत सकारात्मक असावा असे संशोधिकेरा वाटते.

प्र.क्र. २९ मुलींना महाविद्यालयांमध्ये येताना जातान तत्सम मुलांकडून त्रास होतो का? असा होता. प्रतिसादक प्राचार्याकडून मिळालेल्या माहितीनूसार १० (६६.६६ टक्के) प्राचार्यांनी मुलींना येता जाताना तत्सम मुलांकडून त्रास होतो असे

सांगितले. तर ५ (३३.३३ टक्के) प्रतिसादक प्राचार्यांनी तत्सम मुलांकडून त्रास होत नाही असे सांगितले.

यावरुन बऱ्याच अंशी मुलींना कॉलेजला येता जाताना मुलांकडून त्रास होतो हे सिद्ध होते. यावरुन अजूनही समाजाचा मुलीकडे पाहण्याचा दृष्टीकोण तितकासा चांगला नाही असे वाटते. आज तर मुलांच्या पुढे दुरदर्शन वरील मालिका व विविध वाहिण्या, चित्रपट इ. माध्यमातून मिळणाऱ्या अनुभवांचे अनुकरण करण्याकडे कल आहे. सामाजिक दृष्ट्या अशा मुलांवर कोणाचा वचक दिसत नाही. त्यामुळे मुलींना अशा मुलांकडून छळण्याचा त्रास होतो व काही मुलींना शिक्षणाबद्दल अडथळे निर्माण होतात. पालकांनाही अशा मुलांचा बंदोबस्त करता येत नसल्याने आपल्या मुलींचे शिक्षण बंद केलेले बरे असे वाटते.

प्र.क्र. ३० मुलींना खालील तत्सम मुलांकडून त्रास होत असल्यास त्याचा बंदोबस्त कसा करता? असा विचाला होता

प्रतिसादक प्राचार्यांनी दिलेल्या माहिती वरुन १५ प्राचार्यपैकी १० प्राचार्यांनी ज्यांनी मुलींना त्रास होतो असे सांगितले त्यांनी प्रसंगानुरुप बंदोबस्त करता असे सांगितले. बहुतेक प्राचार्य मुलींच्या या त्रासामधून बंदोबस्त करीत नव्हते असे दिसून आले. बाकीच्या ५ प्राचार्यमते मुलींच्या बाबतीत आजही समाजाचा दृष्टीकोन संकुचित आहे. त्यामुळे त्यांना सामाजिक समस्या येवू शकतात. त्या कोणत्या आहेत हे जाणण्यासाठी प्र.क्र. ३१ मुलींच्या सामाजिक समस्या कोणत्या आहेत असे विचारले होते.

प्रतिसादक प्राचार्यांनी दिलेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिले आहे.

## कोष्टक क्र. ४.११

### मुलीच्या शिक्षणाविषयी समाजाचा दृष्टीकोनाविषयीच्या माहितीचे विश्लेषण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शिक्षण घेणाऱ्या मुलींकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन विकृत आहे | १ | ६६.६६ |
| २ | शिक्षित मुलीसाठी वर संशोधन अवघड जाते असा गैरसमज | ४ | २६.६८ |
| ३ | मुलींना परगावी शिक्षणास पाठविणे असुरक्षित वाटते | ७ | ४६.६८ |
| ४ | पालकांवर जुन्या रिती परंपरा अंधश्रध्दांचा पगडा | १ | ०६.६६ |
| ५ | समाजात अजूनही स्त्रीला दिले जाणारे दुय्यम स्थान | १ | ०६.६६ |
| ६ | मुस्लिम संस्कृतीतील रुढी परंपरा आढ येतात. उर्दू माध्यमामध्ये जेवढे गावात शिक्षण देणे शक्य आहे तेवढेच देतात. | १ | ०६.६६ |
| | एकूण | १५ | १०० |

कोष्टकावरुन मिळालेल्या माहिती वरुन असे दिसून येते की ७ (४६.६८ टक्के) प्राचार्यांनी सर्वात मोठी सामाजिक समस्या नमूद केली होती. ती म्हणजे मुलींना परगावी शिक्षणासाठी पाठविणे पालकांना असुरक्षित वाटते. यावरुन संशोधिकेस असे वाटते की, प्रत्येक ठिकाणी किमान १२ वी पर्यंत तरी शिक्षणाची सोय असावी व वस्तीगृहाची प्रत्येक शहराच्या ठिकाणी व्यवस्था असावी जेणे करुन पालकांची असुरक्षितेची भावना नष्ट होईल. त्यानंतरची समस्या म्हणजे मुलीचे शिक्षण जास्त झाले की तिच्या शिक्षणापेक्षा जास्त शिकलेला वर शोधणे कठिण जाते. काही मुले जास्त शिकलेल्या मुली नको म्हणतात कारण त्यांना भीती असते

की जास्त शिकलेली मुलगी नाकापेक्षा मोती जड ठरेल. काही पालकोची इच्छा असते की आपल्या मुलीच्या शिक्षणाप्रमाणे तिला वर नौकरीवाला मिळावा पण सध्या नौकरी लागणे कठीण आहे. अशावेळी बरेच पालक असा विचार करतात की मुलींना कमी शिकवून त्यांचे लग्न करावे हा पालकांचा दृष्टीकोन आहे. ती आज समाजाची वस्तूस्थिती आहे. आजचे शिक्षण मुलांना व्यवसायिक दृष्ट्या स्वावलंबी बनवित नाही. तो पर्याय सुशिक्षित बेकार मुलांच्या मुलींच्या लग्नाचा प्रश्नही समाजापुढे उभा राहील.

या समस्येवरील काही मार्ग शोधण्यासाठी प्रश्न क्र. ३२ विचारला होता.

मुलींच्या सामाजिक समस्या दूर करण्यासाठी महाविद्यालये कोणते प्रयत्न करते. प्रतिसादक प्राचार्याकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील प्रमाणे --

**कोष्टक क्र. ४.१२**

**मुलींच्या सामाजिक समस्यांच्या निर्मुलनासाठी केलेल्या प्रयत्नाचे वर्गीकरण**

| अं.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे.प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पालकांच्या भेटी घेतो | ४ | २६.६७ |
| २ | जास्तीत जास्त सोई पुरवितो | २ | १३.३३ |
| ३ | शिक्षणाचे महत्त्व पालकांना पटवितो. | ७ | ४६.६७ |
| ४ | राज्य परिवाहन मंडळास गाडयांच्या वेळा सुचवितो. | २ | १३.३३ |
| ५ | पालक - शिक्षक विद्यार्थिनी मेळावा घेतो. | | |
| | एकूण | १५ | १०० |

कोष्टकावरुन मिळालेल्या माहितीवरुन असे दिसून येते की ७ (४६.६८ टक्के) व प्रतिसादक प्राचार्य, पालकांना मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देतात. तर ४ (२६.६८ टक्के) प्राचार्य पालकांच्या वारंवार भेटी घेतात. २ (१३.३३ टक्के) योग्य त्या जास्तीत जास्त सुविधा व सोई उपलब्ध करुन देतात व २ (१३.३३ टक्के) परिवहन मंडळाच्या गाड्यांच्या योग्य वेळा सुचवितात. यावरुन सर्वच प्रतिसादक प्राचार्य मुलींच्या शैक्षणिक समस्यांवर सामाजिक समस्या सोडविण्यास तत्पर होते असे दिसून येते.

## (च) मुलींच्या आर्थिक समस्या विषयी माहिती

मुलींच्या जशा सामाजिक समस्या असतात तशा आर्थिक समस्याही असू शकतात. त्या कोणत्या हे जाणून घेण्यासाठी प्र.क्र. ३३ ते ३८ विचारले होते.

प्र.क्र. ३३ हा मुलींच्या आर्थिक स्थिती असते का? असा होता.

प्रतिसादक प्राचार्यानी दिलेल्या माहितीवरुन ९ (६० टक्के) प्राचार्य आर्थिक स्थिती कारण ठरत नाही या मताचे होते तर ६ (४० टक्के) प्राचार्य आर्थिक स्थिती मुलींच्या अनुपस्थितीस कारण ठरते या मताचे होते. यावरुन ६० टक्के प्राचार्याचे म्हणणे मुलीच्या अनुपस्थितीस आर्थिक स्थिती कारणीभूत ठरत नाही असे असले तरी हे मत प्राचार्यांनी शहरातील मुलींच्या आर्थिक स्थिती लक्षात घेवून उत्तर दिले होते. ग्रामीण भागात आजही आर्थिक स्थिती मुलींच्या शिक्षणात अडथळा ठरते. मुलींना शाळेत पाठवावयाचे म्हणजे तिला चांगले कपडे द्यावे लागतात. पुस्तेक, वह्या हे साहित्ये दयावे लागते. त्यासाठी पालक पैसे खर्च करु शकत नाहीत. त्यामुळे ४० टक्के प्राचार्यांनी व्यक्त केलेले मत आर्थिक स्थिती मुलींच्या अनुपस्थितीस कारणीभूत ठरते हे जास्त महत्त्वाचे आहे असे संशोधिकेस वाटते. त्यांच्या घरी काही वेळा पुरसे अन्न कपडे नसतात. काही वेळा घरातील कामांना हातभार लावणे गरजेचे होते. त्यामुळे मुलीना गैरहजर रहावे लागते.

प्र.क्र. ३४ आर्थिक स्थिती कमकूवत असल्यास कोणते उपया योजले जाऊ शकतात असा होता.

प्रतिसादक प्राचार्याने दिलेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिले आहे.

## कोष्टक क्र. ४.१३
## कमकुवत आर्थिक स्थितीवर केल्या जाणाऱ्या उपाय योजनेचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शैक्षणिक साहित्य मोफत पुरवितो | ४ | २६.६७ |
| २ | सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना राबवितो | ८ | ५३.३३ |
| ३ | शिष्यवृत्ती देतो | १ | ०६.६७ |
| ४ | प्रवास सवलत देतो | १ | ०६.६७ |
| ५ | शैक्षणिक संस्थेमार्फत वसतिगृहात मोफत प्रवेश देतो | १ | ०६.६७ |
| | एकूण | १५ | १०० |

कोष्टकामध्ये दिलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की ८ (५३.३३ टक्के) प्राचार्य सावित्रीबाई दत्तक पालक योजना राबवितात. ४ (२६.६७ टक्के) शैक्षणिक साहित्य मोफत पुरवितात. प्रत्येकी १ (६.६७ टक्के) प्रवास सवलत देतात, शिष्यवृत्ती देतात, वसतिगृहात मोफत प्रवेश देतात असे उपाय आर्थिक स्थिती कमकुवत असलेल्या विद्यार्थिनींच्या विकासासाठी प्राचार्य प्रयत्न करीत होते. यावरुन विद्यार्थिनींच्या शैक्षणिक विकासासाठी प्राचार्य जागृत असल्याचे दिसून

आले. ही बाब खूपच चांगली वाटते. प्रत्येक मुलीच्या चर्चेतून प्राध्यापकाच्या प्रश्नावलीत असे आढळले आहे.

प्र.क्र. ३५ मुलींसाठी पुस्तक खरेदीसाठी काही खास सवलत दिली जाते का? असा होता.

प्रतिसादक प्राचार्याकडून मिळालेल्या माहितीवरुन १२ (८० टक्के) प्राचार्य मुलींसाठी पुस्तके खरेदीसाठी काही खास सवलत देत होते तर ३ (२० टक्के) प्राचार्य सवलत देत नव्हते. प्राध्यापक व मुलींच्या म्हणण्यानुसार मुलींना अशी मदत दिली जाते. यावरुन बहुतांश प्रतिसादक प्राचार्य मुलींसाठी सवलती देत होते बाकीच्या २० टक्के प्राचार्यांही अशी सवलत द्यावी असे संशाधिकेस वाटते.

प्र.क्र. ३६ मुलींसाठी स्त्री रोग तज्ञांनच्या भेटी किंवा आरोग्य शिबीरे आयोजित केली जातात का? असा विचारला होता.

प्रतिसादक प्राचार्यानी दिलेल्या माहितीवरुन ७३.३३ टक्के प्राचार्यांनी स्त्री रोग तज्ञांनच्या भेटी व आरोग्य शिबीरे आयोजित केली जात असल्याचे सांगितले तर २६.३३ टक्के प्राचार्यांनी नाही असे सांगितले. प्रत्यक्ष मुलींशी चर्चा केली असता बहुतेक प्रतिसादक प्राचार्य हे विद्यार्थिंनीच्या आरोग्याच्या विकासाबाबतही जागृत होते असे दिसून येते. अशी जागृकता सर्वच प्राचार्यांनी दाखवावी असे संशोधिकेस वाटते.

प्र.क्र. ३७ परगावच्या किंवा गावातील मुलींच्या येण्याजाण्यासाठी काही खास सुविधा आहेत का? असा विचारला होता.

प्रतिसादक प्राचार्यानी दिलेल्या माहितीवरुन कोणत्याच कनिष्ठ महाविद्यालयामार्फत मुलींच्या येण्याजाण्याची सोय केली जात नव्हती असे दिसून आले.

प्र.क्र. ३८ मुलींना वस्तुरुप साह्य दिले जाते का? असा विचारला होता.

प्रतिसादक प्राचार्यानी दिलेल्या माहितीवरुन ९ (६० टक्के) प्राचार्यांनी मुलींना वस्तुरुप सहाय्य दिले जाते असे सांगितले. तर ६ (४० टक्के) प्राचार्यानी वस्तुरुप सहाय्य दिले जात नाही असे सांगितले. त्या वस्तु कोणत्या असतात या विषयी मुलींशी चर्चा केली असता पुस्तके , कपडे, सायकल इ. असतात असे समजले. यावरुन ६० टक्के प्राचार्य मुलींच्या शिक्षणासाठी मदत करीत होते ही बाब चांगली आहे असे वाटते.

## (छ) मुलींच्या समायोजनाविषयी माहिती

मुलींच्या भावी आयुष्याचा दृष्टीकोन त्यांना स्वावलंबी बनविणारे काही अभ्यासक्रम असणे आवश्यक असते असे कोणते अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालयात ठेवले जातात. हे जाणण्यासाठी प्र.क्र. ३९ विचारला होता.

प्र.क्र. ३९ मुलींना भावी काळात उपयोगी पडतील असे कोणत्या अभ्यासक्रम चालविले जातात असा होता.

प्रतिसादक प्राचार्याकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिले आहे.

### कोष्टक क्र. ४.१४

### मुलींना भावी काळात उपयोगी पडतील असे जे अभ्यासक्रम चालविले जातात त्यानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे.प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | संगणक प्रशिक्षण | ५ | ३३.३३ |
| २ | भरतकाम, पाकशास्त्र, विणकाम | ५ | ३३.३३ |
| ३ | बालवाडी कोर्सेस | २ | १३.३३ |
| ४ | गृहपयोगी वस्तु तयार करणे | ३ | २०.०० |
| | एकूण | १५ | १०० |

कोष्टक क्र. ४.१४ वरुन सध्याच्या काळात आवश्यक असणारे संगणक प्रशिक्षण फक्त ५ (३३.३३ टक्के) महाविद्यालयांमध्ये दिले जात होते. सर्वच कनिष्ठ महाविद्यालयामध्ये पाकशास्त्र, भरतकाम, विणकाम हे मुलींच्या भावी जीवनात उपयोगी पडतील असे अभ्यासक्रम ठेवले होत तर ३ (२० टक्के) कनिष्ठ महाविद्यालयामध्ये गृहोपयोगी वस्तु तयार करणे, २ (१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयामध्ये बालवाडी प्रशिक्षण कोर्सेस चालविले जात होते. प्रत्यक्ष पाहणीतही ते आढळून आले. यावरुन मुलींच्या भावी आयुष्याला उपयोगी पडणारे अभ्यासक्रम काही कनिष्ठ महाविद्यालयामध्ये चालू होते ही चांगली गोष्ट वाटते.

प्र.क्र. ४० मुलींच्या सर्जनशिलतेला पोषक अभ्याक्रम आहे का? असा विचारला होता.

प्रतिसादक प्राचार्यांनी दिलेल्या माहितीनूसार सर्वच महाविद्यालयांमध्ये अभ्याक्रम हा मुलींच्या सर्जनशिलतेला पोषक होता असे म्हणणे होते.

प्र.क्र. ४१ गृहउपयोगी साधने व कला यांची जादा तासिका घेतली जाते का? असा विचाला होता.

प्रतिसादक प्राचार्यांनी दिलेल्या माहितीनुसार १५ कनिष्ठ महाविद्यालयांपैकी ८ (५३.३३ टक्के) महाविद्यालयांमध्ये गृहपयोगी साधने व कला यांची जादा तासिका घेतल्या जात होत्या व ७ (४६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अशा तासिका घेतल्या जात नव्हत्या. यावरुन सर्वच कनिष्ठ महाविद्यालये मुलींच्या दिलेल्या माहितीवरुन थोडया मोजण्या इतकीच म्हणजे ४ (२६.६६ टक्के) महाविद्यालये मुलींच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्नशिल असल्याचे दिसून आले. ही स्थिती पूर्ण महाविद्यालयांच्या दृष्टीने समाधानकारक नव्हती सर्वच महाविद्यालयांकडून असे प्रयत्न व्हावेत असे संशोधिकेस वाटते.

मुलींच्या मानसिक भावनिक विकास योग्य प्रकारे व्हावा यासाठी शाळामधून सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करुन त्यांच्या सुप्त गुणांना वाव देता येतो त्यासाठी

सांस्कृतिक कार्यक्रमांचे कोणते उपक्रम राबविले जातात असा प्रश्न क्र. ४२ विचारला होता.

प्रतिसादक प्राचार्याकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिले आहे.

## कोष्टक क्र. ४.१५

## सांस्कृतिक कार्यक्रमांच्या उपक्रमानुसार कनिष्ठ महाविद्यालयांचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | स्नेह संमेलन वकृत्त्व स्पर्धा, निबंध स्पर्धा आयोजित करतो | २ | १३.३४ |
| २ | स्नेह संमेलन ऐतिहासिक पुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या साजरा करतो. | ७ | ४६.६६ |
| ३ | विविध स्पर्धा युवक महोत्सवात सहभाग घेण्याची संधी देतो. | २ | १३.३४ |
| ४ | विज्ञान प्रदर्शन, विज्ञान जत्रा इ. आयोजित करतो | ४ | २६.३३ |
| | एकूण | १५ | १०० |

कोष्टकातील माहितीवरुन सर्वच कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जात होते व उपक्रम राबविले जात होते. ही बाब उल्लेखनिय होती. विशेषतः थोर पुरुष्यांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या साजऱ्या करणे, प्रदर्शन भरविणे यावर भर होता. परंतु विविध स्पर्धांना प्राधान्य दिले जात नसल्याचे दिसून आले. वास्तविक स्पर्धामधुनच मुलींचा वैयक्तिक विकास दुनावतो. परंतु स्पर्धाकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे प्रत्यक्ष मुलाखतीत आढळून आले. स्पर्धाचे प्रमाणही प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयात वाढवावे असे संशोधिकेस वाटते.

प्र.क्र. ४३ सांस्कृतिक कार्यक्रमात मुली भाग घेतात का? असा होता.

प्रतिसादक प्राचार्यांनी दिलेल्या माहितीवरुन १५ महाविद्यालयापैकी सर्वच महाविद्यालयातील मुली काही प्रमाणात भाग घेत होत्या ही गोष्ट समाधानकारक होती.

प्र.क्र. ४४ मुलींच्या व्यवसायकतेला पोषक अभ्यासक्रम आहे का? असा होता.

प्रतिसादक प्राचार्याकडून मिळालेल्या माहितीनुसार मुलींच्या व्यवसायीकतेला पोषक अभ्यासक्रम सर्वच कनिष्ठ महाविद्यालयामध्ये राबविला जात होता ही बाब समाधानकारक होती.

प्र.क्र. ४५ मुलींच्या व्यवसायिकतेला पोषक अभ्यासक्रम नसल्यास कोणते उपया सुचवाल असा विचाला होता. त्यावर सर्वच १५ (१०० टक्के) कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यानी प्रतिसादमध्ये मुलींच्या सुप्त गुणांना, आवडीला व सर्जनशिलतेला वाव देणारा व भविष्य काळात त्या व्यवसाय करु शकतील असा अभ्यासक्रम असावा असे सांगितले.

प्र.क्र. ४६ मुलींना संगणक प्रशिक्षण दिले जाते का असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यानी दिलेल्या माहितीनुसार १५ पैकी १४ (९३.३४ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयामध्ये संगणक प्रशिक्षण दिले जात होते व १ (६.६६ टक्के) महाविद्यालयांमध्ये संगणक प्रशिक्षण दिले जात नव्हते.

प्र.क्र. ४७ मुलींसाठी व्यवसाय मार्गदर्शन कोणकोणत्या पध्दतीने केले जाते असा होता. प्रतिसादक प्राचार्याकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात देण्यात आले आहे.

## कोष्टक क्र. ४.१६

## मुलींसाठी व्यवसाय मार्गदर्शनानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | व्यवसाय मार्गदर्शन चर्चासत्राचे आयोजन करतो. | २ | १३.३३ |
| २ | सुज्ञ व अनुभवी व्यक्तीचे मार्गदर्शन दिले जाते. | २ | १३.३३ |
| ३ | व्यवसाय मार्गदर्शन शिबिरे आयोजित केली जातात. | २ | १३.३३ |
| ४ | व्याख्याने आयोजित करतो. | २ | १३.३३ |
| ५ | इ. १० व १२ वी नंतरच्या व्यवसायिक प्रशिक्षणाची माहिती पुरवितो. | ७ | ४६.६८ |
| | एकूण | १५ | १०० |

कोष्टकातील माहितीवरुन असे दिसून येते की, इ. १० वी व १२ वी नंतरच्या व्यवसायिक प्रशिक्षणाची माहिती पुरवूनच बहुतांश महाविद्यालयांमध्ये मुलींसाठी व्यवसाय मार्गदर्शन केले होते हि बाब चांगली होती.

### (ज) मुलींच्या शिक्षणातील समस्याविषयीची माहिती

प्र.क्र. ४८ मुलींच्या शिक्षणातील आपल्या दृष्टीने कोणत्या समस्या आहेत असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात देण्यात आले आहे.

## कोष्टक क्र. ४.१७

## मुलींच्या शैक्षणिक समस्यानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | खेड्यातील पालक शिक्षणापेक्षा विवाहाला जास्त महत्त्व देतात. | २ | १३.३३ |
| २ | पालकांची शिक्षणाविषयी अनास्था समाजाची जाचक रुढी परंपरांची बंधने मुलींना दिले जाणारे गौणत्व | ५ | ३३.३३ |
| ३ | परगावी शिक्षणाला पाठविण्याला पालकांचा विरोध | ७ | ४६.६७ |
| ४ | उच्च शिक्षणाविषयी गैरसमज व इतर | १ | ०६.६७ |
| | एकूण | १५ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, २ (१३.३३ टक्के) प्रतिसादक प्राचार्य ग्रामीण भागातील पालक शिक्षणापेक्षा विवाहाला महत्त्व देतात. या पर्यायाशी सहमत होते. ५ (३३.३३ टक्के) प्रतिसादक प्राचार्य हे पालकांची शिक्षणाविषयी अनास्था समाजाची जाचक रुढी, परंपरा बंधने, मुलींना दिले जाणारे गौणत्व या पर्यायाशी सहमत होते. ७ (४६.६७ टक्के) प्रतिसादक प्राचार्यांनी परगावी शिक्षणास पाठविण्यास पालकांचा विरोध या पर्यायाशी सहमती दर्शविली तर १ (६.६७ टक्के) प्रतिसादक प्राचार्य हे उच्च शिक्षणास पालकांचा विरोध या पर्यायाशी सहमत होते. या माहिती वरुन बहुतांश पालक हे परगावी मुलींना शिक्षणास पाठविण्यास विरोध दर्शवित असल्याची समस्या जाणवते म्हणून विद्यार्थिनींना वस्तीगृहाची सोय उपलब्ध करुन द्यावी असे संशोधिकेस वाटते. शिक्षणाविषयी पालाकांची अनास्था समाजाचा नकारात्मक दृष्टीकोन हे घटक ही

मुलींच्या शिक्षणास अडथळा ठरत असल्याचे ३३.३३ टक्के प्राचार्यांच्या म्हणण्यावरुन लक्षात येते. खेडयातील पालक शिक्षणाला महत्त्व न देता मुलींच्या लग्नाला अधिक महत्त्व देतात ह्याही लक्षात घेण्यासारख्या समस्या मुलींच्या शिक्षणात येतात.

प्र.क्र. ४९ मुलींच्या समस्या सोडविण्यासाठी आपण कोणते उपाय सुचवाल असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून मिळालेल्या माहिती वरुन १५ (१०० टक्के) प्राचार्य हे एकच उपया सुचवत होते. तो म्हणजे पालक व समाज यांचे प्रबोधन करणे. यावरुन पालक व समाजच मुलींच्या शिक्षणात समस्या निर्माण करतात म्हणून त्यांचेच प्रबोधन करुन या समस्या दुर करणे गरजेचे आहे असे संशोधिकेस वाटते.

प्राचार्यांच्या प्रश्नावलीतील माहितीची सत्यता पडताळण्यसाठी व अधिक माहिती मिळविण्यासाठी संशोधिकेने दूसरे साधन प्राध्यापकासाठी प्रश्नावली वापरले होते.

## ४.३ प्राध्यापकांच्या प्रश्नावलीच्या साह्याने मिळालेल्या माहितीचे विश्लेषन व अर्थ निर्वाचन

संशोधिकेने बार्शी तालुक्यातील १५ कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण १८ प्राध्यापकांना प्रश्नावल्या दिल्या होत्या.

प्रास्ताविक प्राध्यापकांनी दिलेल्या प्रश्नावल्यांमधील माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन पुढील प्रमाणे आहे प्रश्नावली परिशिष्ट क्र. ४ मध्ये दिली आहे.

### (क) प्राध्यापकांची वैयक्तिक माहिती

या विभागातील प्र.क्र. १ ते ४ हे प्राध्यापकांच्या वैयक्तिक माहितीशी संबंधित होते.

प्र.क्र. १ प्राध्यापकांच्या कॉलेजच्या नावाविषयी विचारला होता तर दुसरा प्राध्यापकांच्या नावाविषयी विचारला होता. प्रतिसादक प्राध्यापकांची यादी त्यांच्या महाविद्यालयासह परिशिष्ट क्र. ५ मध्ये दिली आहे.

प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयातील एका जेष्ठ प्राध्यापकाला प्रश्नावली दिली होती पण श्री शिवाजी महाविद्यालय व झाडबुके महाविद्यालय ही महाविद्यालये विस्ताराने माठी असल्याने ह्या महाविद्यालयातील प्रत्येकी दोन प्राध्यापकांना प्रश्नावली दिली होती.

प्र.क्र. ३ प्राध्यापकांच्या शैक्षणिक पात्रतेविषयी होता. प्रतिसादक प्राध्यापकाकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकांत देण्यात आले आहे.

## कोष्टक क्र. ४.१८

## प्राध्यापकांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | एम.ए., बी.एड. | ११ | ६१.१२ |
| २ | एम.एस्सी., बी.एड. | ०४ | २२.२३ |
| ३ | एम.कॉम., एम.ए., एम.एड. | ०१ | ०५.५५ |
| ४ | एम.एस्सी., एम.फील | ०१ | ०५.५५ |
| ५ | एम.ए., एम.एड., एम.फील | ०१ | ०५.५५ |
| | एकूण | १८ | १०० |

वरील कोष्टकातील माहिती वरुन ११ (६१.१२ टक्के) प्रतिसादक प्राध्यापक हे एम.ए.,एम.एड शैक्षणिक पात्रता असणारे होते. ४ (२२.२३ टक्के) प्राध्यापक एम.एस्सी., एम.एड. १ (५.५५ टक्के), एम.एस्सी., एम.फील १ (५.५५ टक्के), एम.ए., एम.एड., एम.फील १ (५.५५ टक्के) असे शैक्षणिक पात्रता धारण केलेले प्राध्यापक होते सर्वाधिक प्राध्यापक एम.ए., बी.एड होते कारण बार्शी तालुक्यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयामंध्ये कला शाखाच जास्त प्रमाणात होत्या. त्या प्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयांतील प्राध्यापक योग्य ती पात्रता धारण करणारे होते ही चांगली गोष्ट होती.

प्र.क्र. ४ प्राध्यापकांच्या अध्यापन अनुभवाविषयी विचारला होता. प्रतिसादक प्राध्यापकांच्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात देण्यात आले आहे.

**कोष्टक क्र. ४.१९**

**प्राध्यापकांच्या अध्यापन अनुभवाच्या माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | अनुभव वर्षे (वारंवारिता) | प्राध्यापकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ०१ ते ०५ | ४ | २२.२३ |
| २ | ०६ ते १० | ८ | ४४.४५ |
| ३ | ११ ते १५ | १ | ०५.५५ |
| ४ | १६ ते २० | २ | ११.११ |
| ५ | २१ ते २५ | २ | ११.११ |
| ६ | २६ ते ३० | १ | ०५.५५ |
| | एकूण | १८ | १०० |

वरील कोष्टकावरुन १ ते ५ वर्षे अनुभव असणारे प्राध्यापक ४ (२२.२३ टक्के) व ६ ते १० वर्षे अनुभव असणारे प्राध्यापक ८ (४४.४५ टक्के), ११ ते १५ वर्षे अनुभव असणारे प्राध्यापक १ (५.५५ टक्के) होते. १६ ते २० वर्षे अनुभव असणारे २ (११.११ टक्के) प्राध्यापक होते. २१ ते २५ वर्षे अनुभव असणारे २ (११.११ टक्के) प्राध्यापक होते तर २६ ते ३० वर्षे अनुभव असणारे १ (५.५५ टक्के) प्राध्यापक होत यावरुन सर्वात जास्त ६ ते १० वर्षे अनुभव असणारे प्राध्यापक होते. यावरुन बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयामध्ये पुरेसा अनुभव असणारे प्राध्यापक होते. अशा अनुभवी प्राध्यापकाकडून मिळालेली माहिती पुरेशी व संशोधनाला सहाय्यभुत ठरणारी होती.

**(ख) विद्यार्थीनींच्या वैयक्तिक, शैक्षणिक व सामाजिक समस्यांविषयी माहिती.**

विद्यार्थीनीच्या शैक्षणिक व सामाजिक समस्याविषयी माहिती जाणण्यासाठी प्र.क्र. ५ ते ९ विचारले होते. प्र.क्र. ५ व ६ ची माहिती प्राचार्याकडून मिळालेल्या माहितीशी जोडली आहे.

प्र.क्र. ७ मुलींना येणाऱ्या समस्या प्राध्यापक कशा रितीने सोडविताता हे जाणण्यासाठी विचारला होता.

प्रतिसादक प्राध्यापकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ४.२०

### मुलींच्या समस्या निर्मूलनाच्या प्रयत्नानुसार वर्गीकरण

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादाक संख्या | प्रतिसाद शे.प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ग्रामीण भागातील पालकांच्या भेटी घेऊन त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देतो. | ७ | ३८.८९ |
| २ | पालक मेळावे घेऊन स्त्री शिक्षणाचे महत्त्व पालकांना पटवून देतो. | ४ | २२.२२ |
| ३ | अल्पवयीन मुलींच्या विवाहाचे दुष्परिणाम सांगता | ४ | २२.२२ |
| ४ | राज्य परिवहन मंडळाला बस सुविधेच्या वेळेविषयी विनंती करतो. मुलींना पंचायत समितीकडून सायकल मिळवून देतो. | ३ | १६.६७ |
| | एकूण | १८ | १०० |

वरील उपलब्ध माहिती नुसार सर्वात जास्त म्हणजे ७ (३८.८९ टक्के) प्राध्यापक पालकांना मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देतो या पर्यायाशी सहमत होते. ४ (२२.२२ टक्के) प्राध्यापक पालक मेळावे घेणे या पर्यायाशी सहमत होते. ४ (२२.२२ टक्के) प्राध्यापक अल्पवयीन मुलींच्या विवाहाचे दुष्परिणाम पालकांना पटवून देणे या पर्यायाशी सहमत होते तर ३ (१६.६७ टक्के) प्राध्यापक मुलींच्या बसच्या समस्या सोडविणे, त्यांना सायकल उपलब्ध करुन देणे या पर्यायाशी सहमज होते. यावरुन बहुतांश प्राध्यापकांना मुलीच्या पालकांच्या भेटी घेऊन त्यांना स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे हाच समस्येवरील तोडगा होता.

प्र.क्र. ८ मुलींना अनेक समस्या येतात त्या समस्या कोणत्या कारणांनी येतात ती कारणे जाणून घेण्यासाठी प्र.क्र. ८ विचारला होता. प्रतिसादक प्राध्यापकांनी दिलेली माहितीचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ४.२१

### मुलीच्या समस्यांच्या कारणानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ग्रामीण भागातील पालकांची शिक्षणाविषयी अनस्था, मुलींच्या समाजातील दुय्यम दर्जा, आर्थिक स्थिती बेताची. | १० | ५५.५६ |
| २ | ग्रामीण संस्कृतीचा पालकांच्या मनावर पगडा व आर्थिक स्थिती कमकुवत | ०५ | २७.७८ |
| ३ | पालकांचा मुलींच्या शिक्षणाविषयी उदासीन दृष्टीकोन व मुलींची शिक्षणा विषयी अनास्था | ०२ | ११.११ |
| ४ | अज्ञान जुनी विचारसरणी जेमतेम शिक्षणावर समाधानाने आर्थिक परिस्थितीचा अडसर | ०१ | ०५.५५ |
| | एकूण | १८ | १०० |

कोष्टकातील माहितीवरुन सर्वात जास्त १० (५५.५६ टक्के) प्राध्यापक मुलींच्या समस्येचे कारण पालकांची मुलीच्या शिक्षणाविषयी अनास्था स्त्रीचा समाजातील दुय्यम दर्जा व आर्थिक स्थिती बेताची असणे हे मानतात तर ५ (२७.७८ टक्के) प्राध्यापक ग्रामीण संस्कृतीचा पालकांच्या मनावर पगडा असल्याने मुलींच्या शिक्षणात समस्या येतात असे मानत होते.

२ (११.११ टक्के) प्राध्यापकांनी मुलीच्या व पालकांचा शिक्षणाविषयीचा उदासीन दृष्टीकोन या पर्यायाला सहमती दर्शविली व १ (५.५५ टक्के) प्राध्यापक अज्ञान व जुनी विचारसरणी जेमतेम शिक्षणावर समाधान, आर्थिक परिस्थितीचा अडसर या पर्यायाशी सहमत होते. यावरुन ग्रामीण भागातील पालकांची मुलीच्या शिक्षणाविषयी असणारी अनास्था, मुलींना शिकवुन उपयोग काय हा दृष्टीकोन

त्यांचा विवाह हेच मुख्य कर्तव्य मानणे व त्याच बरोबर मुलींना परगावी शिक्षणास पाठविण्याची घरची आर्थिक स्थिती नसते ही कारणे प्रामुख्याने दिसून आली.

प्र.क्र. ९ पालकांचा मुलींच्या शिक्षणाविषयीचा दृष्टीकोन कसा आहे हे जाणण्यासाठी विचारला होता.

प्रतिसादक प्राध्यापकांच्या माहितीनुसार एकूण १८ प्राध्यापकांपैकी ९(५० टक्के) प्राध्यापक हे मुलींनी मुलांच्या बरोबरीने भरपुर शिकावे असे पालकांना वाटते या मताशी सहमत होते. तर ९ (५० टक्के) प्राध्यापक हे पालकांना वाटते जेमतेम शिकावे मुलींना शिकून तरी काय संसारच करावयाचा असतो या पर्यायाशी सहमत होते. यावरुन अजूनही पालकांचा दृष्टीकोन नकारात्मक आहे असे संशोधिकेस वाटते त्यादृष्टीने ग्रामीण जनता जागृत करणे गरजचे आहे असे वाटते.

## (ग) सहशिक्षणाविषयी माहिती.

सहशिक्षणाविषयी प्राध्यापकांचे मत जाणून घेण्याविषयी विचारला होता.

प्रतिसादक प्राध्यापकांपैकी १८ प्राध्यापकांना म्हणजेच १०० टक्के प्राध्यापकांना सहशिक्षण असावे असे वाटत होत.

प्र.क्र. ११ सहशिक्षणाचे आपल्या दृष्टीने कोणते फायदे आहेत असा विचारला होता.

प्रतिसादक प्राध्यापकांनी दिलेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील प्रमाणे आहे.

### कोष्टका क्र. ४.२२

**सहशिक्षणाच्या फायदयाविषयीच्या माहितीनुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मुलींचा आत्मविश्वास वाढतो, समायोजनसाधता येते | ७ | ३८.८८ |
| २ | गंड दुर होतो निर्भयता वाढते | ३ | १६.६७ |
| ३ | समाजशील वृत्ती धीटपणा वाढतो. समायोजन साधता येते. | ७ | ३८.८८ |
| ४ | स्पर्धेला सामोरे जाण्याची वृत्ती निर्माण होत इतर | १ | ०५.५६ |

वरील कोष्टकातील माहितीवरुन सहशिक्षणामुळे मुलींचा आत्मविश्वास वाढतो. समायोजन साधता येणे न्यूनगंड दूर होणे, निर्भयता वाढणे, समाजशील वृत्ती, धीटपणा, समायोजन स्पर्धेला सामोरे जाण्याची वृत्ती इ. बरेचसे फायदे सांगण्यात आले होते यावरुन सहशिक्षण फायदयाचेच आहे असे वाटते.

प्र.क्र. १२ सहशिक्षणाचे तोटे कोणते? हा होता.

प्रतिसादक प्राध्यापकांच्या माहितीनुसार सहशिक्षणाचे कोणतेच तोटे नव्हते. परंतु सर्वच मुली सहशिक्षणामुळे निर्भय बनतात व समायोजन साधून शकतात असे संशोधिकेस वाटत नाही.

प्र.क्र. १३ मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी महाविद्यालयात काय करता येईल असा होता.

प्रतिसादक प्राध्यापकांनी दिलेल्या माहितीचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ४.२३

## मुलींच्या शिक्षणाविषयी महाविद्यालयाच्या प्रश्नांच्या माहितीचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसाद स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मुलींच्या भावी जिवनाला उपयुक्त अभ्यासक्रम रांबविणे | ९ | ५०.०० |
| २ | स्त्री शिक्षकांची नेमणूक करणे | ५ | २७.७८ |
| ३ | मुलींच्या कला गुणांना वाव मिळेल असे अभ्यासक्रम राबविणे | ४ | २२.२२ |
| | एकूण | १८ | १०० |

वरील कोष्टकातील माहितीवरुन ९ (५० टक्के) प्रतिसादक प्राध्यापकांनी मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या भावी जीवनास उपयुक्त अभ्यासक्रम राबवावा हा पर्याय सुचविला होता. ५ (२७.७८ टक्के) प्रतिसादक

प्राध्यापकांच्या मतानुसार स्त्री शिक्षकाची नेमणूक करणे योग्य होते. ४ (२२.२२ टक्के) प्रतिसादक प्राध्यापक मुलींच्या कला गुणांना वाव मिळेल असे अभ्यासक्रम राबविणे या पर्यायाशी सहमत होत. यावरुन ५० टक्के प्राध्यापक मुलींच्या भावी जीवनाला उपयुक्त अभ्यासक्रम राबवावे यामताचे होत तर बाकीच्या ५० टक्के प्राध्यापकाची पुढील शिक्षणास प्रोत्साहन मिळावे म्हणून त्यांच्या समस्या जाणून घेणा-या स्त्री प्रशिक्षिका नेमाव्या, कला गुणानां वाव मिळणारा अभ्यासक्रम असावा असे मत व्यक्त केले.

प्र.क्र. १४ मुलीसाठी कोणते व्यावसायिक अभ्यासक्रम राबविले जावेत असा होत.

प्रतिसादक प्राध्यापकांनी दिलेली माहिती पुढील कोष्टकात दिली आहे.

**कोष्टक क्र. ४.२४**

**मुलींच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे.प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | घरबसल्या व्यवसाय करता येईल असे अभ्यासक्रम असावेत | २ | ११.१२ |
| २ | शिवणकाम, भरतकाम, हस्तकला, पाककला, संगणक, पेटींग | ८ | ४४.४४ |
| ३ | टंकलेखन, शिवणकाम, संगणक व्यापार विषयक | २ | ११.१२ |
| ४ | संगणक, गृहविज्ञान, आरोग्य विज्ञान | ५ | २७.७७ |
| ५ | इंटिरिअर डेकोरेशन, ब्युटीशियन फॅशन डिसायनर, संगणक विषयक | १ | ०५.५५ |
| | एकूण | १८ | १०० |

वरील कोष्टकात दिलेल्या माहितीनूसार सर्वात जास्त म्हणजे ८ (४४.४४ टक्के) प्रतिसादक प्राध्यापकांना मुलींना व्यावसायिक स्वरुपाचे अभ्यासक्रम म्हणजे शिवणकाम, भरतकाम, पाककला, हस्तकला, संगणक, पेटींग इ. प्रकारचे अभ्याक्रम दयावेत असे वाटत होते. बार्शीच्या ५५.५६ टक्के प्राध्यापकांनाही संगणक, ब्युटिशियन असे घरी करता येणारे व्यवसायाचे शिक्षण द्यावे असे वाटते होते. परंतु सध्याच्या संगणक युगाला आवश्यक असे अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालयात राबविले जावेत असे संशोधिकेस वाटते.

प्र.क्र. १५ मुलींना त्यांच्या विकासाच्या दृष्टीने मार्गदर्शन मिळण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात असा होता.

प्रतिसादक प्राध्यापकांनी दिलेल्या माहितीनूसार सर्वच कनिष्ठ महाविद्यालयात प्रसिध्द यशस्वी स्त्री व्यक्तीमत्त्वांच्या भेटी, मार्गदर्शन शिबीरे व व्याख्याने आयोजित केली जात हाती.

प्र.क्र. १६ आपल्या दृष्टीने व मार्गदर्शनपर व्याख्याने व भेटी यांचे फायदे कोणते?

प्रतिसादक प्राध्यापकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

**कोष्टक क्र. ४.२५**

**मार्गदर्शन पर व्याख्याने महत्त्वाचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मुलीमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. | १० | ५५.५६ |
| २ | योग्य मार्गदर्शन मिळते | ०२ | ११.११ |
| ३ | समाज व विद्यार्थीनी यांचे उदबोधन होते | ०१ | ०५.५६ |
| ४ | मुलींना प्रेरणा मिळते | ०५ | २७.७७ |
| ५ | एकूण | १८ | १०० |

वरील कोष्टकावरुन १० (५५.५६ टक्के) प्रतिसादक प्राध्यापकांचे मत होते मार्गदर्शन पर व्याख्याने व भेटी यांच्यामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. २ (११.११ टक्के) प्राध्यापक योग्य मार्गदर्शन मिळते या पर्यायाशी सहमत होते. १ (५.५६ टक्के) प्राध्यापक समाज व विद्यार्थिनी यांचे उदबोधन होते या पर्यायाशी सहमत होते. तर ५ (२७.७७ टक्के) प्राध्यापक मुलींना प्रेरणा मिळते या पर्यायाशी सहमत हाते.

प्र.क्र. १७ मुलींने आपल्या शैक्षणिक क्षेत्र निवडीसाठी जागृत राहवे यासाठी कोणते उपया सुचवाल असा होता.

सर्वच प्रतिसादक प्राध्यापकांचे मतानुसार मुलींनी घरातील किंवा समाजातील सुशिक्षीत लोकांचे मार्गदर्शन घ्यावे व शिक्षकांचा पण सल्ला घ्यावा व आपले शैक्षणिक क्षेत्र निवडावे.

## (घ) मुलींच्या शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी शासनाच्या प्रयत्नाविषयी माहिती.

प्र.क्र. १५ मुलींचा शैक्षणिक व सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी शासनाने कोणते प्रयत्न करावे असे वाटते असा होता.

प्रतिसादक प्राध्यापकाने दिलेल्या माहितीचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ४.२६

## मुलींच्या उन्नतीसाठी शासनाच्या प्रयत्नानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | महाविद्यालयीन शिक्षणासाठी कॉलेज व वस्तीगृहाचे माफक फीमध्ये सोय असावी. | ०५ | २७.७८ |
| २ | उच्च शिक्षण मोफत, समाजातील गुंड प्रवृत्तीच्या मुलांपासुन संरक्षण | ०२ | ११.११ |
| ३ | मुलींना पदवीपर्यंतचे शिक्षण सक्तीचे करावे | ०१ | ०५.५६ |
| ४ | सर्वच स्तरावर मुलींचे शिक्षण मोफत असावे | १० | ५५.५५ |
| | एकूण | १८ | १०० |

यावरुन बहुसंख्य प्राध्यापकांचे मत सर्वस्तरावर मुलींना मोफत शिक्षण दयावे असे होते. आता कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत महाराष्ट्र शासनाने मुलींना मोफत शिक्षण योजना चालू केली आहे. ही स्वागतार्ह गोष्ट आहे तसेच काही प्राध्यापकांनी समाजातील व महाविद्यालयातील गुंड प्रवृत्तीच्या तरुणांकडून मुलींना होणारा त्रास कमी व्हावा यासाठी समाजाने व शासनाने प्रयत्न करावा असे वाटते. या सर्व सूचना स्वागतार्ह आहेत असे संशोधिकेला वाटते.

वरील कोष्टकातील माहितीवरुन ५(२७.७८ टक्के) प्राध्यापकांना मुलींना महाविद्यालयीन शिक्षणासाठी कॉलेज व वस्तीगृहाची माफक फी मध्ये सोय व्हावी असे वाटत होते. २ (११.११ टक्के) प्राध्यापक उच्च शिक्षण मोफत, समाजातील गुंड प्रवृत्तीच्या मुलांपासून संरक्षण या मताशी सहमत होते. १ (५.५६ टक्के) प्राध्यापक मुलींना पदवीपर्यंत शिक्षण सक्तीचे करावे या पर्यायाशी सहमत होते. तर सर्वाधिक म्हणजे १० (५५.५५ टक्के) प्राध्यापक मुलींना सर्व स्तरावर शिक्षण मोफत असावे या मताशी सहमत होते.

## ४.४ विद्यार्थिनींच्या मुलाखतीव्दारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन.

प्राचार्य व प्राध्यापकांना प्रश्नावली देवून माहिती गोळा केली त्या माहितीशी पूरक व जादा माहिती मिळविण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींच्या मुलाखती घेतल्या. पहिले दोन प्रश्न मुलींच्या नावा विषयी व इयत्ते विषयी होते. यांची यादी परिशिष्ठ क्र. ६ मध्ये दिले आहे.

प्र.क्र. १ महाविद्यालयातील वातावरणाविषयी विचारला होता.

प्रतिसादक विद्यार्थिंनी पैकी एकूण ४० जनीपैकी ३० (७५ टक्के) मुलींनी कनिष्ठ महाविद्यालयातील वातावरण चांगले आहे असे सांगितले होत तर १० (२५ टक्के) मुलींनी महाविद्यालयातील वातावरण बरे मध्यम आहे असे सांगितले होते. यावरुन बहुतांश कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक व इतर बाबतीतील वातावरण चांगले होते.

प्र.क्र. २ मुलींच्या शिक्षणाविषयी महाविद्यालयाकडून दिल्या जाणाऱ्या सवलती विषयी होता. प्रतिसादक विद्यार्थिनीनी मुलाखतीतून दिलेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील प्रमाणे आहे.

### कोष्टक क्र. ४.२७

**महाविद्यालयाकडून दिल्या जाणाऱ्या सवलतीच्या माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रतिसदाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | थोड्याफार प्रमाणात सवलती दिल्या जातात | २५ | ६२.५० |
| २ | सवलती दिल्या जात नाहीत | १० | २५.०० |
| ३ | फक्त इ. १२ वी पर्यंत मोफत शिक्षण हीच एक सवलत दिली जाते. | ०५ | १२.५० |
| | एकूण | ४० | १०० |

कोष्टकामध्ये दिलेल्या माहिती वरुन २५ (६२.५० टक्के) प्रतिसादक मुली महाविद्यालयांकडून थोडयाफार प्रमाणात सवलती दिल्या जातात या मताशी सहमत होत्या. तर १० (२५ टक्के) मुली सवलती दिल्या जात नाही या मताशी ठाम होत्या. ५ (१२.५० टक्के) मुली फक्त इ. १२ वी पर्यंत मोफत शिक्षण हीच एक सवलत दिली जाते यामताच्या होत्या. यावरुन कनिष्ठ महाविद्यालयाकडून मुलींच्या शिक्षणासाठी दिल्या जाणाऱ्या सवलती समाधानकारक नाही असे दिसून येते.

प्र.क्र. ३ मुलींच्या विकासासाठी केल्या जाणाऱ्या खास प्रयत्नांशी होता.

प्रतिसादक विद्यार्थिनीनी दिलेल्या उत्तराचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

**कोष्टक क्र. ४.२८**

**मुलींच्या विकासासाठी प्रयत्नानुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रतिसदाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | थोड्याफार प्रमाणात मुलींच्या विकासासाठी प्रयत्न केले जात होते | १६ | ४०.०० |
| २ | मुलींच्या विकासासाठी अजिबात प्रयत्न केले जात नव्हते. | ०५ | १२.५० |
| ३ | मुलींच्या विकासासाठी बरचशे प्रयत्न केले जातात | ०३ | ०७.५० |
| ४ | मुलींच्या विकासासाठी प्रयत्न केले जात नव्हते. | १६ | ४०.०० |
| | एकूण | ४० | १०० |

वरील कोष्टकातील माहिती वरुन १६ (४० टक्के) विद्यार्थिनीच्या मते महाविद्यालयाकडून मुलींच्या विकासासाठी थोडयाफार प्रमाणात प्रयत्न केले जात होते. ५ (१२.५ टक्के) विद्यार्थिनी महाविद्यालयाकडून अजिबात प्रयत्न केले जात नाहीत या मताच्या होत्या. ३ (७.५ टक्के) विद्यार्थिनी महाविद्यालयाकडून बरचसे प्रयत्न केले जातात या मताच्या होत्या तर १६ (४० टक्के) विद्यार्थिंनीच्या मते

महाविद्यालयाकडून प्रयत्न केले जात नव्हते. यावरुन मुलींच्या विकासासाठी थोडयाफार प्रमाणात तरी महाविद्यालयाकडून प्रयत्न केले जात होत असे सिध्द होते.

प्र.क्र. ४ महाविद्यालयातील मुले मुली यांच्या सहसंबंधाविषयी होता.

प्रतिसादक विद्यार्थिनीनी दिलेल्या माहितीवरुन एकूण ४० उत्तरापैकी १९ (४७.५ टक्के) विद्यार्थिनीनी सहसंबंध मैत्री पूर्ण आहेत असे सांगितले होते. १३ (३२.५० टक्के) मुलींनी कलूशित आहेत असे सांगितले होते तर ८ (२० टक्के) मुलींनी ना मैत्री पूर्ण ना कलूशित बरे आहेत असे सांगितले होत.

प्र.क्र. ५ महाविद्यालयातील विद्यार्थ्याकडून होणाऱ्या त्रासा विषयी होता.

प्रतिसादक विद्यार्थिनीकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

### कोष्टक क्र. ४.२९

### कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्याच्या माहितीचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | महाविद्यालयातील विद्यार्थ्याकडून कुठल्याही प्रकारचा त्रास होतो. | २४ | ६० |
| २ | महाविद्यालयातील विद्यार्थ्याकडून कुठल्याच प्रकारचा त्रास होत नाही. | १६ | ४० |
| | एकूण | ४० | १०० |

वरील माहिती वरुन असे दिसून येते की निम्म्यापेक्षा जास्त ६० टक्के मुलींना महाविद्यालयातील मुलांकडून त्रास हा होतोच.

प्र.क्र. ६ महाविद्यालयातील प्राध्यापकांकडून कोणत्याही प्रकारचा त्रास होतो का असा होता.

प्रतिसादक विद्यार्थिनींनी दिलेल्या माहिती नुसार ३५ (८७.५ टक्के) विद्यार्थिनींनी कोणत्याच प्रकारचा त्रास होत नाही असे उत्तर दिले होते तर ५ (१२.५ टक्के) विद्यार्थिनींनी त्रास होतो असे उत्तर दिले होते.

प्र.क्र. ७ होणाऱ्या त्रासा विरुध्द कोणती उपाय योजना केली जाते असा होता.

प्रतिसादक विद्यार्थिनींच्या मतानुसार सर्वाधिक ३८ (९५ टक्के) मुली प्राचार्याकडे तक्रार  या मताशी सहमत होत्या तर २ (५ टक्के) विद्यार्थिनी पालक व मैत्रीनींची मदत घेणे या मताशी सहमत होत्या.

प्र.क्र. ८ महाविद्यालयीन व शिक्षणातील समस्या विषयी होता.

प्रतिसादक विद्यार्थिनीकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

**कोष्टक ४.३०**

**महाविद्यालयीन शैक्षणिक समस्याच्या माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पालकांचा पुढील इ. १२ वी नंतर शिक्षणाला विरोध आहे. | २० | ५० |
| २ | परगावी शिक्षणाला येणे अवघड वाटते | ०८ | २० |
| ३ | वस्तीगृहाची सोय नसल्याने येण्याजाण्याचे हाल होतात. | १० | २५ |
| ४ | विद्यार्थि संख्या खूप असल्याने प्राध्यापकांना सर्वाकडे लक्ष देता येत नाही. | ०२ | ०५ |
| | एकूण | ४० | १०० |

वरील कोष्टकातील माहिती नुसार २० (५० टक्के) विद्यार्थिनींची मुख्य समस्या इ. १२ वी नंतरच्या शिक्षणास पालकांचा विरोध ही होती. ८ (२० टक्के) विद्यार्थिनीना परगावी शिक्षणासाठी येणे ही समस्या वाटत होती. १० (२५ टक्के) विद्यार्थिनीना वस्तीगृहाची सोय नाही ही समस्या होती. तर २ (५ टक्के) विद्यार्थिनीच्या मते विद्यार्थी संख्या जास्त असल्याने प्राध्यापकांना सर्वाकडे लक्ष देता न येणे ही समस्या वाटत होती.

प्र.क्र. ९ मैत्रीणीच्या अशा कोणत्या समस्या आहेत की ज्या ती फक्त तुम्हालाच सांगू शकते असा होता.

प्रतिसादक विद्यार्थिनीपैकी ३८ (९५ टक्के) विद्यार्थिनीच्या मैत्रीनींना मुलांकडून होणारे छेड छाड, एक तर्फी प्रेम प्रकरण, मुलांचे मागे लागणे अशा प्रकारच्या समस्या होत्या तर २ (५ टक्के) विद्यार्थिनींना अभ्यास विषयक समस्या होत्या यावरुन जास्त प्रमाणात मुलांकडून होणारा त्रास ही एक गंभीर समस्या आहे असे वाटते.

प्र.क्र. १० मैत्रिनींना येणाऱ्या समस्यावर कोणती उपया योजना कराल असा होता.

प्रतिसादक विद्यार्थिनीनी दिलेल्या माहितीवरुन सर्वच १०० टक्के विद्यार्थिनी, पालक व प्राचार्य यांची मदत घेणे पसंत करीत होत्या.

प्र.क्र. ११ एकतर्फी प्रेम प्रकरण वगैरे समस्या येतात का असा होता.

प्रतिसादक विद्यार्थिनीपैकी १४ (३५ टक्के) विद्यार्थिनीनी येतात असे उत्तर दिले होत तर २६ (६५ टक्के) विद्यार्थिनीनी अशा समस्या येत नाहीत असे उत्तर दिले होते.

प्र.क्र. १२ एकतर्फी प्रेमप्रकरणाची समस्या असल्यास त्यावर कोणता उपया योजाल असा होता.

प्रतिसादक विद्यार्थिनींनी दिलेल्या माहितीवरुन ३५ (८७.५ टक्के) मुलींनी प्राचार्य व पालक यांच्या मदतीने त्यां मुलाचे कान उघडणी करु असे उत्तर दिले होते. तर ५ (१२.५ टक्के) विद्यार्थिनींनी मुलीनी अशा प्रकरणाला वाव मिळेल असे वर्तन, वेश भुषा टाळावी असे उत्तर दिले होते.

प्र.क्र. १३ आपल्या शिक्षणाविषयी आई वडिलांचा दृष्टीकोन कसा आहे असा होता.

प्रतिसादक विद्यार्थिनींनी दिलेल्या उत्तरावरुन ३० (७५ टक्के) विद्यार्थिनींनी आई वडिलांचा दृष्टीकोन चांगला आहे असे उत्तर दिले होते तर १० (२५ टक्के) विद्यार्थिंनीनी पालकांचा शिक्षणाविषयी दृष्टीकोन चांगला नाही असे उत्तर दिले होते. यावरुन ७५ टक्के पालकांचा मुलींच्या शिक्षणाविषयीचा दृष्टीकान सकारात्मक आहे असे दिसून येते.

प्र.क्र. १४ नातेवाईकांच्या शिक्षणाविषयीचा दृष्टीकोन कसा आहे असा होता.

प्रतिसादक विद्यार्थिनीनी दिलेल्या उत्तरावरुन बहुतांश नातेवाईकाचाही म्हणजेच ३० (७५ टक्के) विद्यार्थिनीच्या नातेवाईकांचाही शैक्षणिक दृष्टीकोन चांगला होता. तर १० विद्यार्थिनीच्या नातेवाईकांच्या मते मुलींना पोटापूरतेच म्हणजे लिहीता वाचता येईल एवढे. इ. १० वी पर्यंतच शिक्षण दयावे असे वाटत होते.

प्र.क्र. १५ आपल्या मते शिक्षण महत्त्वाचे की लग्न असा होता.

प्रतिसादक विद्यार्थिनीच्या मते ३१ (७७.५ टक्के) विद्यार्थिंनीना शिक्षण महत्त्वाचे वाटत होत तर ९ (२२.५ टक्के) विद्यार्थिनीना दोन्ही महत्त्वाचे वाटत होत. यावरुन असे दिसून येते की सर्वच विद्यार्थिनी आपल्या शिक्षणाविषयी जागृत होत्या ही बाब समाधानकारक वाटते.

प्र.क्र. १६ आपले नातेवाईक मुलांइतकेच मुलींच्या शिक्षणास महत्त्व देतात का असा होता.

प्रतिसादक विद्यार्थिनी पैकी २८ (७० टक्के) विद्यार्थिनीचे नातेवाईक मुलांइतकेच मु लींच्या शिक्षणास महत्त्व देणारे होते तर १२ (३० टक्के) मुलीचे नातेवाईक मुलांइतकेच मुलींच्या शिक्षणास महत्त्व देणारे नव्हते. यावरुन बहुतांश समाज हा मुलींच्या शिक्षणास प्राधान्य देणारा होता ही चांगली बाब आहे.

प्र.क्र. १७ नातेवाईक शिक्षणास महत्त्व देण्याचे कारण कोणते असा होता.

प्रतिसादक विद्यार्थिनीच्या मतानुसार ३८ (९५ टक्के) विद्यार्थिनीच्या नातेवाईकांच मत असे होते की शिक्षणाशिवाय समाजातही मान नाही व लग्नाच्या बाजारात ही शिकलेल्या मुलींनांच जास्त मागणी आहे. २ (५ टक्के) विद्यार्थिनीच्या मते स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे असे नातेवाईकांचे मत आहे.

प्र.क्र. १८ नातेवाईक मुलांइतके मुलींच्या शिक्षणास महत्त्व देत नसल्यास कारण काय असावे असा होता.

प्रतिसादक विद्यार्थिनीच्या मते सर्वच विद्यार्थिनीचे मत असे होत की ग्रामीण भागातील पालक मुलींच्या शिक्षणापेक्षा लग्नाला महत्त्व देतात व शिकलेल्या मुलींचे लग्न जमविणे अवघड जात असे त्यांना वाटते.

## ४.५ भेटी व निरीक्षणाव्दारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषन व अर्थनिर्वचन

बार्शी तालुक्यात एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालये आहेत. सर्वच कनिष्ठ महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्या भेटीव्दारे मिळालेली माहिती प्राचार्यांच्या प्रश्नावलीशी संबंधीत होती किंवा प्राध्यापकांच्या प्रश्नावलीशी संबंधीत होती ती दिलेली आहेच. उर्वरित माहिती खालील प्रमाणे आहे.

### क) प्राध्यापकांसंबधी माहिती

१) प्रत्यके कनिष्ठ महाविद्यालय हे माध्येमिकशी किंवा वरिष्ठ महाविद्यालयाशी सलग्न असलेले आढळले. स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालय बार्शी तालुक्यात एकही नाही. त्यामुळे तेथील प्राध्यापकांच्या अध्यापनामध्ये फरक दिसून आला तो असा माध्यमिकशी सलग्न कनिष्ठ महाविद्यालयात जवळजवळ सर्वच ठिकाणी कथन, वर्णन, पध्दतीचा अवलंब केला जातो. वरिष्ठ नहाविद्यालयाशी सलग्न कनिष्ठ महाविद्यालयात व्याख्यान पध्दतीचा अवलंब केल्याचे आढळून आले.

२) माध्यमिकशी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना माध्यमिकच्या तासिका दिल्या जातात. त्यामुळे त्यांच्यामध्ये निराशा असल्याचे आढळून आले.

३) वरिष्ठ महाविद्यालयाशी सलग्न प्राध्यापक हे अध्यापनाबाबत समाधानी असल्याचे आढळून आले.

४) ऑफ तास किंवा बुलेटीनच्या वेळेला बंहुतेक प्राध्यापक नुसते बसून राहतात व विद्यार्थ्यांना शांत बसण्याची सूचना देतात. थोडक्यात

केवळ तासिका संपेपर्यत वर्गात अशीच प्राध्यापकांची समजूत दिसून आली. वस्तूतः वेळ, श्रम, पैसा या गोष्टीचा हा अपव्यय आहे.

५) माध्यमिकशी सलग्न प्राध्यापकांना वरिष्ठ महाविद्यालयांशी सलग्न कनिष्ठ महाविद्यालये असावे असे वाटते.

## ख) भौतिक सुविधाँ विषयी माहिती

१) बहुसंख्य ७३.३३ टक्के महाविद्यालयांच्या इमारती स्लॅपच्या आसून काही इमारती वर पत्रे होते.

२) २ (१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये मंदिराच्या आवरात भरत होती.

३) १ (८६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये गावापासून वाजवी अंतरावर असून बाकीची २ (१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये गावात गजबजलेल्या परिसरात होती.

४) बहुसंख्य ७३.३३ टक्के कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग खोल्या पुरेशा होत्या.

५) ८ (५३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था चांगली होती.

६) १० (६६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये हवेशिर वातावरणात होती.

७) विज्ञान शाखा असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात सुसज्य प्रयोग शाळा होती.

८) ४ (२६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात समृध्द ग्रंथालय होते.

९) १५ (१०० टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात सायकल स्टँड होते.

## ग) वर्ग खोल्या व इतर सुविधा विषयी माहिती

१) बहुतांशी कनिष्ठ महाविद्यालयातून वेळापत्रके दिसून आली.

२) ११ (७३.३५ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयातून वर्ग खोल्याची स्वच्छता होती.

३) १० (६६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग खोल्या हवेशी वायुविजनयुक्त होत्या.

४) ८ (५३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांना सभागृहांची सुविधा नव्हती.

५) १० (६६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयातील भिंती बोलक्या होत्या तेथे चित्रे, तक्ते, नकाशे होते.

६) १३ (८६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयातून पुरेशे फर्निचर असल्याचे आढळून आले.

७) ११ (७३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांना खेळाचे मैदान असल्याचे आढळून आले.

८) ८ (५३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये बाग बगिचांनी फुललेली दिसून आले.

९) ११ (७३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयातून अभ्यासक्रम नियोजन व घटक नियोजन केले आहे.

१०) १३ (८६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यामध्ये शिस्त असल्याचे दिसून आले.

## समारोप

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्राचार्याची प्रश्नावली, प्राध्यापकांची प्रश्नावली व विद्यार्थिनीच्या मुलाखती तसेच भेटी व निरीक्षण या व्दारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे. यावरुन पुढील प्रकरणात निष्कर्ष व शिफारशी दिलेल्या आहेत.